आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

३ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात आजपासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या १ कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा
- खादी उद्योगाची उलाढाल गेल्या आर्थिक वर्षात एक लाख पंचावन्न हजार कोटी रुपयांच्या वर
- हैदराबाद क्रिकेट असोसिएशनशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीकडून मोहम्मद अझरुद्दीनच्या नावे समन्स जारी

**आणि**

- महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजाह इथं सुरुवात

**<><><><><>**

राज्यात आजपासून सर्वत्र शारदीय नवरात्रौत्सवाला उत्साहाने प्रारंभ झाला. आजपासून पुढचे नऊ दिवस देवीच्या नऊ रुपांचं पूजन केलं जाईल. तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी आणि माहूरची रेणुका या साडेतीन शक्तीपीठांच्या मंदिरांमध्येही नवरात्रोत्सवाला घटस्थापनेने प्रारंभ झाला. याशिवाय राज्यात इतरत्रही देवी मंदिरांमधे उत्सव सुरु झाला. मुंबईतही मुंबादेवी आणि महालक्ष्मी यांच्या मंदिरांमध्ये या उत्सवाला सुरुवात झाली आहे. घरोघरी घटस्थापना करुन भाविक देवीचं

पूजन करीत आहेत. **रत्नागिरी** जिल्ह्यात रत्नदुर्ग किल्ल्यावरची श्री भगवती देवी, आडिवऱ्याची महाकाली, दाभोळची चंडिका देवी, चिपळूणची विंध्यवासिनी अशा पुरातन मंदिरांसह जिल्ह्यातल्या देवीच्या अन्य मंदिरांमध्ये नवरात्रौत्सवानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही आज अनेक मंदिरांमध्ये घटस्थापना झाली. **छत्रपती संभाजीनगरात** कर्णपुरा इथल्या तुळजाभवानी देवीच्या यात्रेला आजपासून सुरुवात झाली. **धुळे** शहरातल्या एकविरा माता मंदिरात देखील नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. **नागपुरातही** कोराडी इथल्या श्री महालक्ष्मी जगदंबेच्या मंदिरात नवरात्रौत्सवाला आज मोठ्या आनंदात आणि उत्साहात सुरुवात झाली. नवरात्रौत्सवानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या १ कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं म्हटलं आहे. राज्यातल्या २ कोटी महिलांना लाभ मिळालेली ही सर्वात मोठी आणि ऐतिहासिक योजना असल्याचंही पवार आपल्या संदेशात म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं सूतकताई कामगार आणि हातमाग विणकरांच्या वेतनात वाढ केली आहे. त्यानुसार आता सूतकताई कामगारांना २५ टक्के तर हातमाग विणकरांना ७ टक्के अधिक वेतन मिळेल. गेल्या १७ सप्टेंबरला जाहीर झालेला हा निर्णय कालपासून लागू झाला आहे. खादी आणि ग्रामोद्योग आयुक्त मनोज कुमार यांनी सांगितलं की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात खादी उद्योगातल्या कामगारांच्या वेतनात एकूण २१३ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे या क्षेत्रातल्या कामगारांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला असल्याचं ते म्हणाले. खादी उद्योगाची उलाढाल गेल्या आर्थिक वर्षात एक लाख पंचावन्न हजार कोटी रुपयांच्या वर गेल्याची माहिती त्यांनी दिली. ग्राहकांना खादी उत्पादनांवर २० टक्के तर ग्रामोद्याग उत्पादनांवर १० टक्के सवलत मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं. आजपासून सुरु झालेला हा सेल येत्या ३० ऑक्टोबर पर्यंत चालणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा रेडिओच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याच्या मन की बात हा विशेष कार्यक्रम सुरु झाल्याला आज १० वर्ष पूर्ण झाली. प्रधानमंत्र्यांनी २०१४ मध्ये आजच्या दिवशी पहिल्यांदा या कार्यक्रमातून जनतेशी थेट संवाद साधला होता.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना देश विदेशात भेट स्वरूपात मिळालेल्या वस्तूंच्या इ- लिलावाची तारीख आता ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली

आहे. पूर्वी हा लिलाव १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत होणार होता. प्रधानमंत्र्यांना मिळालेल्या भेट वस्तूंच्या लिलावाची ही ६वी आवृत्ती असून यातून मिळणारा निधी नमामि गंगे प्रकल्पासाठी वापरला जाणार असल्यामुळे नागरिकांनी मोठया संख्येनं बोली लावून या कार्यात योगदान द्यावं, असं आवाहन सरकारनं केलं आहे.

**<><><><><>**

इस्त्राइल - इराण युद्धाचा मोठा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारात दिसून आला. सेन्सेक्स सध्या सतराशे हून अधिक अंकांनी घसरुन ८२ हजार ५०० अंकांच्या जवळ व्यवहार करतो आहे. निफ्टी ५०० हून अधिक अंकांनी घसरुन २५ हजार २५० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

**<><><><><>**

मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अग्रणी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंती निमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना अभिवादन केलं आहे. स्वामी रामानंद तीर्थ हे मराठवाड्यासह हैद्राबाद मुक्त करण्यासाठी आपलं सर्वस्व पणाला लावणारे सेनापती तसंच आध्यात्मिकता आणि राजकारण यांचा विलक्षण संयोग साधणारं लोकप्रिय नेतृत्व, आणि शिक्षणतज्ञ होते, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या अभिवादनपर संदेशात म्हटलं आहे.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त मराठवाड्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीनं आज माजी अध्यक्ष आणि क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन याला समन्स बजावलं. अझरुद्दीनवर आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात निधीचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या आर्थिक व्यवहारांबाबत चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश ईडीने दिले आहेत.

<><><><><>

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. उद्घाटनाचा सामना बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंडचा संघ यांच्यात होणार आहे. दुपारी साडेतीन वाजता खेळाला सुरुवात होईल. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे.

येत्या २० ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. या स्पर्धेत मागील तिनही वेळा ऑस्ट्रेलियानं विजेतेपद मिळवलं असून भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. यंदा मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं.

<><><><><>

पेरू मधे लीमा इथं आंतरराष्ट्रीय नेमबाजी संघटनेतर्फे सुरू असलेल्या जागतिक कनिष्ठगट नेमबाजी स्पर्धेत भारताच्या खुशीनं महिलांच्या ५० मीटर रायफल ३ प्रकारात कांस्य पदक पटकावलं. या बरोबरच भारताची पदकसंख्या १५ झाली आहे. यात १० सुवर्ण, १ रौप्य आणि ४ कांस्य

पदकांचा समावेश आहे. पदक तालिकेत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. सांघिक प्रकारात १ हजार ७५७ गुणांसह पाचव्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

वाशीम जिल्ह्यात मनोरा तालुक्यातल्या बंजारा समाजाची काशी मानल्या जाणाऱ्या पोहरादेवी इथं बंजारा विरासत संग्रहालय उभारण्यात आलं आहे. येत्या शनिवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संग्रहालयाचं लोकार्पण केलं जाणार आहे. संग्रहालयाच्या चार मजली इमारतीच्या १३ दालनांमध्ये विविध देखावे आणि चित्रांद्वारे बंजारा समाजाचा इतिहास, त्यांचे उत्सव, समाज जीवन रंगवण्यात आलं असून एका दालनात समाजाच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या थोर नेत्यांची माहिती आणि पुतळे ठेवण्यात आले आहेत. संग्रहालयाचं एक विशेष दालन जगद्गुरू संत सेवालाल महाराज यांचं जीवन चरित्र आणि उपदेश याना समर्पित आहे.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातल्या शिवणी बामणी, डोंगरगाव आणि दिग्रस शिवारात छापा टाकून पोलिसांनी ६७ लाख रुपयांहून अधिक किमतीचा सुमारे १४ क्विंटल गांजा जप्त केला आहे. या भागात गांजाची लागवड अवैधपणे केल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांना ही कारवाई केली. या प्रकरणात अमली पदार्थ विरोधी कायद्यांअंतर्गत ७ जणांविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यात परंडा इथले शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर रावसाहेब पाटील यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं ते एकोणसाठ वर्षांचे होते. गेले काही दिवस ते आजारी होते. १९९५ आणि १९९९ मधे ते परंडा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले होते. तसेच परंडा नगरपालिकेचे नगरसेवक म्हणूनही काम करत होते. त्यांच्या पार्थिवावर आज परंडा इथं अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यतल्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य क्षेत्राचे सहाही दरवाजे कालपासून पर्यटकांसाठी उघडण्यात आले. यावेळी प्रकल्प व्यवस्थपकांनी फुलं देऊन प्रकल्पात आलेल्या पर्यटकांचं स्वागत केलं. हे दरवाजे उघडल्यानंतर पहिल्याच दिवशी पर्यटकांनी दमदार हजेरी लावली असून मुख्य क्षेत्र आणि परिसरात एक हजार पर्यटक गेल्याची आणि त्यांना वाघाचं दर्शन झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. प्रकल्पाचे दरवाजे दरवर्षी पावसाळी सुट्टीच्या काळात ३ महिने बंद ठेवले जातात.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी ठाणे पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. संबंधित शाळा आदर्श विद्यालय संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि कार्यवाह तुषार आपटे या दोघांना गुन्हे अन्वेषण शाखेनं कर्जतमधून ताब्यात घेतलं. या दोघांचा अटकपूर्व जामीनासाठीचा अर्ज काल मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. त्यांना नंतर विशेष तपास पथकाच्या ताब्यात देण्यात

आल्याचं ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सांगितलं.  या दोघांवर पोक्सो कायद्याअंतर्गत लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल न केल्याचा आरोप आहे. विशेष तपास पथकानं याप्रकरणी दोन आरोपपत्रं दाखल केली आहेत.

//<><><><><>//